# Aayushi International Interdisciplinary Research Journal

Monthly Peer Reviewed Journal

Impact Factor 8.379

website : www.aiirjournal.com

email id : aiirjpramod@gmail.com

## Theme of Special Issue

## Republic of India : Idea and Reality

**Special Issue No.150**

ISSN 2349-638X

www.aiirjournal.com

**Chief Editor**

**Dr. Pramod P. Tandale**

**Editor**

**Mr. Pradip B. Patil**

| Sr. No. | Name of the Author | Title of Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 61. | प्रा. नेहा अजिंक्य घरात | भारतीय अर्थव्यवस्थेच्या प्रकाशात प्रजासत्ताक भारताची स्वप्ने आणि वास्तव" | 230 |
| 62. | महात्मे देवदत्त महादेव | प्रजासत्ताक भारत: शारीरिक शिक्षण आणि क्रीडा करिअरच्या संधी आणि योगदान | 236 |
| 63. | अशोक विष्णू माळी | महाराष्ट्रातील आदिवासी चळवळींचा आदिवासी जमातीच्या जीवनावर झालेला परिणाम | 239 |
| 64. | श्री. रामचंद्र चंद्रू पाटील<br>डॉ. विभावरी बाळासाहेब निकम | प्राथमिक स्तर भाषा साक्षरता विकास आणि ज्ञानेंद्रियांच्या प्रभावाचा समन्वय : एक चिकित्सक अभ्यास | 242 |
| 65. | डॉ.नितीन तुकाराम जाधव | भारतीय सामाजिक विकास व चळवळी' | 247 |
| 66. | प्रा. श्रीम. पाटील शारदा शामराव | स्वातंत्र्योत्तर काळातील भारतातील उच्च शिक्षणातील समस्या व त्यावरील उपाययोजना | 250 |
| 67. | श्री संतोष सुरेश पाटील | भारतीय स्वातंत्र्योत्तर काळातील राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांचा अभ्यास. | 254 |
| 68. | अतुल सुरेश टोणे<br>डॉ. शरद वसंत बनसोडे | क्रॉसकंट्री पुरुष व महिला खेळाडूंसाठी प्रशिक्षणाचे वैज्ञानिक मूल्यांकन: एक अभ्यास | 259 |
| 69. | करणसिंह राजेंद्र पाटील | भारतातील प्रादेशिक पक्षांचे भाषिक राजकारण | 262 |
| 70. | श्री.वसीम इस्माईल आंबेकरी | देवबाभाळी नाटकातून साकारलेली स्त्री चित्रण आणि वास्तव | 266 |
| 71. | डॉ भक्ती गोविंद महाजन | 'किरवंत' नाटकातील समाजव्यवस्था आणि वास्तव | 270 |
| 72. | श्री. डी. एन. महाडिक | प्रजासत्ताक भारतातील शिक्षण व्यवस्थेच्या वाटचालीमध्ये सार्वजनिक- खाजगी भागीदारीचे योगदान | 274 |
| 73. | श्री.प्रवीण विलासराव माने | भारतीय प्रजासत्ताकाची वाटचाल | 278 |
| 74. | पोवार स्वप्नील शंकर | भारतीय प्रजासत्ताकाचे भविष्य: तरुणाईची भूमिका आणि आव्हान | 282 |
| 75. | मदने अश्विनी भगवान | कल्पनेतला प्रजासत्ताक भारत : साकार होण्यात भारतीय साहित्याची महत्वपूर्ण भूमिका | 286 |

# देवबाभाळी नाटकातून साकारलेली स्त्री चित्रण आणि वास्तव

**संशोधक — श्री.वसीम इस्माईल आंबेकरी**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड.
इमेल - ezhan99220@gmail.com

**सारांश -**

*स्त्री सक्षमीकरणाचा विचार समाजात एक महत्त्वाची बाब बनली आहे. स्त्रियांच्या जीवनात अनेक चढ-उतार आले आहेत आणि समाजाची मानसिकता वेळोवेळी बदलली आहे. "देवबाभळी" नाटकात प्राजक्त देशमुख यांनी स्त्रीच्या संघर्ष, भावनांचा आणि सामाजिक परंपरांचा उत्कृष्ट प्रतिनिधित्व केले आहे. नाटकातील दोन्ही स्त्री पात्रे — संत तुकारामांची पत्नी अवलाई आणि विठ्ठलाची पत्नी लखुबाई — पुरुषप्रधान संस्कृतीच्या काठावर स्वतःचे अस्तित्व आणि विचार व्यक्त करतात.*

*"देवबाभळी" नाटक स्त्री आणि पुरुष यांच्या द्वंद्वाचा एक स्पष्ट दृष्टिकोन दर्शवते. स्त्री घराच्या चौकटीत कशी अडकली आहे, याचे दर्शन या नाटकातून घडते. नाटकात अवलाई आणि लखुबाई या दोन प्रमुख स्त्री पात्रांनी त्यांच्या आयुष्यातील समस्या आणि त्यांच्याशी संबंधित निर्णय घेत असताना त्यांचा आत्मविश्वास आणि सामर्थ्य उजागर केले आहे. त्या काळातील पारंपरिक समाज व्यवस्थेला छेद देत या स्त्रिया स्वतःच्या निर्णयावर ठाम होऊन त्यांचे अधिकार आणि इच्छास्वातंत्र्य जपण्याचा प्रयत्न करतात. प्रस्तुत शोध निबंध मध्ये देवबाभळी नाटकातील स्त्री चित्रण आणि वास्तवता यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.*

**कळीचे शब्द-** महिला सक्षमीकरण, पुरुषप्रधान संस्कृती, सामाजिक रचना, स्त्रीचे हक्क व अधिकार इ.

**उद्दिष्टे -**

- महिला सक्षमीकरणाची संकल्पना समजून घेणे.
- देवबाभळी नाटकातून स्त्रीचे चित्रण कसे साकारले गेले आहे, याचे विश्लेषण.
- महिला सक्षमीकरणाचे सद्यस्थितीचा आढावा घेणे.

**विषय विवेचन -**

निसर्गाने स्त्री आणि पुरुष अशा दोन जीवांची निर्मिती करून या सृष्टीचा समतोल साधला. एका दोन चाकी वाहनांमध्ये दोन्ही चाक हे महत्त्वाचे असतात त्याच पद्धतीने या निसर्गाचे चक्र चालण्यासाठी निसर्गाने स्त्री आणि पुरुष अशा दोन सजीवांची निर्मिती केली आहे. परंतु समाजाने पुरुषाचे अवास्तव महत्त्व वाढवून महिलांचे महत्व कमी करण्याचा प्रयत्न केला. पुरुषाने आपलं वर्चस्व निर्माण करण्यासाठी स्त्रियांमध्ये असणाऱ्या वैशिष्ट्यांना कमीपणाची भावना निर्माण केली. इथूनच पुरुषप्रधान संस्कृतीचा जन्म झाला आणि पुरुष हा महत्त्वाचा तर स्त्री ही गौण अशी भावना रूढ झाली आणि यातूनच समाजामध्ये समस्या निर्माण होण्यास सुरुवात झाली. परंतु पूर्वीपासूनच महिला आपल्या हक्कासाठी संघर्ष करताना दिसते. शिवकाळातील राजमाता जिजाऊ पासून ते सध्याच्या काळातील सुनीता विल्यम पर्यंतच्या अनेक महिलांनी आपले कर्तुत्व सिद्ध केले. किंवा या पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये आपले स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

आज २१ व्या शतकामध्ये स्त्रियांच्या हक्कासाठी त्यांच्यामधील असणाऱ्या क्षमतांच्या जाणीव साठी किंवा त्यांना समानतेचा दर्जा देण्यासाठी विविध कायदे, संघटना, संस्था या सक्षमीकरणासाठी काम करत असताना दिसतात. परंतु आजची जर वास्तव परिस्थितीचा आढावा घेतला तर, आज स्त्रियांचा समाजामध्ये असणारा वाटा आणि त्या प्रमाणात त्यांना असणारे स्वातंत्र्य, हक्क हे जसे अपेक्षित आहे त्या प्रमाणात मिळत असल्याचे दिसून येत नाही. आज ही महिलांना आपले स्वातंत्र्य, हक्क किंवा आपल्या इच्छांसाठी संघर्ष करावा लागत असताना दिसते. याचाच अर्थ आज देखील समाजामध्ये पुरुषांनी आपल्या पुरुष संस्कृतीचंचे वर्चस्व टिकवून ठेवण्यात काही प्रमाणात यश मिळवलेले आहे.

असाच काही संदर्भ प्राजक्त देशमुख लिखित 'देवबाबळी' या नाटकांमध्ये दिसून येतो. तत्कालीन सामाजिक परिस्थितीला छेद देत संत तुकारामाची पत्नी अवलाई आणि विठ्ठलाची पत्नी लखुबाई ( रखुमाई) या आपापल्या निर्णयाच्या संदर्भात स्वतंत्र असताना दिसतात व तत्कालीन समाजाने निर्माण केलेल्या स्त्रीविषयक नियमा, आचारसंहिता किंवा समाजनिर्मित बंधनांना झुगारून आपले अस्तित्व टिकवण्यासाठी झगडताना दिसतात. परंतु हे करून सुद्धा शेवटी तिला

आपल्या पतीच्या सुखासाठी आणि इच्छासाठी आपले सर्वस्व त्याग करावे लागते. याचाच अर्थ महिला सबलीकरण ही सध्याची संकल्पना नसून पूर्वीपासून स्त्रीमध्ये ज्या-ज्या वेळी स्त्रीमध्ये स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव झाली त्या त्यावेळी त्यांनी आपले सक्षमीकरण करून घेण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

**स्त्री सक्षमीकरणाची संकल्पना**

महिला सक्षमीकरण म्हणजे स्त्रीला आत्मविश्वास, मानसिक स्वातंत्र्य, निर्णय घेण्याची क्षमता आणि समान अधिकार देणे. 'देवबाभळी' मध्ये या स्त्री पात्रांच्या संवादातून याच सक्षमीकरणाचा वेल सोडलेला आहे. अवलाई आणि लखुबाई या दोघींनी समाजाच्या नियमांना नाकारून आपल्या पतीच्या इच्छेविरोधात आपले विचार मांडले आहेत, तरीही त्या दोघी आपल्या पतीच्या छायेतच राहतात.

- **महिलांच्या आत्मनिर्णयावर प्रश्नचिन्ह :** जच्या समाजात देखील महिलांनी स्वतःचे निर्णय घ्यावे, त्यांची स्वच्छंदता ओळखून समानतेसाठी संघर्ष करावा अशी अपेक्षा केली जाते. त्याचप्रमाणे 'देवबाभळी' नाटकात देखील अवलाई आणि लखुबाई एकाच वेळी त्यांच्या जीवनातील प्रतिकूलतेचा सामना करत आहेत. लखुबाई विठ्ठलापासून तुटलेली असली तरीही तिच्या मनातील दुःख आणि अपेक्षांना व्यक्त करण्याची ती स्वतंत्रता घेत आहे.
- **पुरुषप्रधान संस्कृतीचा प्रभाव :** 'देवबाभळी' मध्ये या स्त्रिया पुरुषप्रधान संस्कृतीच्या परिभाषेतील आदर्श स्त्री होण्याचे नकार देत आहेत. या नाटकात त्या आपल्या पतीच्या इच्छेची आणि आज्ञांची निंदा करत त्यांच्याशी संवाद साधतात. त्यांना त्या त्या काळातील स्त्रीसंबंधी असलेल्या असमानतेला नाकारताना पतीच्या आदेशावर उचल घ्यावी लागलेली दिसते. जरी त्या पुरुष प्रधान संस्कृतीला नकार देत असल्या तरीही त्या त्याच्या चौकटीतच बंदिस्त राहतात.
- **नाटकातील संवाद आणि समाजातील दृष्टीकोन :** 'देवबाभळी' नाटकाच्या संवादात स्त्रियांना आपले हक्क मिळवण्यासाठी संघर्ष लागत असल्याचे दिसते. हे संवाद स्त्रियांना त्यांच्या इच्छांचा व अधिकारांविषयी आत्मविश्वास निर्माण करणारे आहेत. आजही अनेक स्त्रिया या दृषटिकोनावर विचार करतात. त्यांनी स्वतंत्र निर्णय घेतले तरी समाजाच्या परंपरेच्या चौकटीत अडकलेल्या आहेत. या नाटकातून असे दिसते की, स्त्रियांना तितकेच स्वातंत्र्य आणि अधिकार द्यावेत जितके पुरुषांना दिले जातात.

  सदर शोध निबंधामध्ये प्राजक्त देशमुख यांनी लेखन केलेल्या 'देवबाभळी' या नाटकाच्या माध्यमातून स्त्रीचे सामाजिक, कौटुंबिक आर्थिक स्थान, निर्णयक्षमता याविषयी आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.
- पूर्वी समाजामध्ये प्रचलित असलेल्या एक आख्यायिका म्हणजे संत तुकारामांच्या बायकोच्या पायात काटा रुतला असताना तो काटा काढण्यासाठी प्रत्यक्ष पांडुरंग हा आला होता ही आख्यायिका आणि या आख्यायिकावर आधारित हे नाटक आणि या नाटकातून संत तुकाराम व पांडुरंग यांची पत्नी रखुमाई ( लखुबाई) एक संत पत्नी आणि दुसरी देव पत्नी यांच्या संवादातून त्यांच्या मानसिक, भावनिक, सामाजिक अवस्थाचे दर्शन घडते.

**देवबाभळी नाटकातील स्त्रीचे चित्रण**

प्राजक्त देशमुख यांच्या "देवबाभळी" नाटकात, दोन स्त्रिया — संत तुकारामांच्या पत्नी अवलाई आणि विठ्ठलाच्या पत्नी लखुबाई यांचे चित्रण मोठ्या गहिराईने केले गेले आहे. या दोन्ही स्त्रिया परंपरागत पद्धतीने स्वतःच्या अस्तित्वाच्या आचारधारांना नाकारत नवऱ्यांच्या इछा आणि कर्तव्यासोबतच आपली व्यक्तिमत्त्वही प्रकट करतात.

अवलाई आणि लखुबाई या दोन्ही स्त्रिया जरी पारंपारिक समाजाच्या व्यवस्थेला विरोध करत असल्या तरी त्यांचा निर्णय आणि त्यांचा संघर्ष हा त्यांच्या अस्तित्वाच्या परिभाषेचा एक भाग बनतो. दोन वेगवेगळ्या प्रकारच्या स्त्रिया एकमेकांच्या संवादातून आपापले दुःख, संघर्ष आणि आपल्या अस्तित्वाच्या मुद्द्यांवर एकमत होतात. या संवादातून समाजाच्या पारंपरिक आणि पुरुषप्रधान संस्कृतीला त्यांनी नकार दिला आहे.

**अवलाई (संत तुकारामांची पत्नी) :** अवलाई संत तुकारामाच्या पत्नी असलेल्या एक महत्त्वाच्या स्त्री पात्राचा भाग आहे. नाटकात ती आपल्या पतीच्या भक्तिपंथी जीवनामुळे त्याच्यापासून दुर राहते. त्या काळातील पारंपारिक व्यवस्थेला छेद देत ती त्याच्या वर्तनाविरोधात आवाज उठवते. परंतु त्याच्या भव्य भक्तिसंस्कारानंतरही तिच्या आतल्या वेदनांचे स्पष्ट चित्रण करण्यात आले आहे. तिच्या मनातील वेदना आणि संघर्ष त्याच्या संवादातून समोर येतात.

**लखुबाई (विठ्ठलाची पत्नी) :** लखुबाई देवाची पत्नी असली तरी तिच्या अस्तित्वाचे एक मोठे वळण आहे. ती आपल्या पतीच्या भक्तिसंस्कारांमध्ये अडकलेली असली तरी, तिच्या भावनांमध्ये आणि तिच्या दुःखात देखील बरेच काही

सांगण्यासारखे आहे. विठोबाच्या भक्तीमध्ये हरवलेला पुरुष, आणि त्यावर ती तितकीच पीडित होते, हे लखुबाईच्या संवादातून मांडले गेले आहे.

**समाजातील स्त्रीची भूमिका**

पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीला घरातील कर्तव्या आणि जबाबदाऱ्या स्वीकारण्याचीच अपेक्षा असते. घरातील सुख-समृद्धी, शांती आणि कुटुंबाची प्रगती ह्या सर्व गोष्टींमध्ये तिचा महत्त्वाचा सहभाग आहे, पण तरीही तिच्या अस्तित्वाला घराच्या परिघातच सीमित केले जाते.

देवबाभळी नाटकातील दोन्ही स्त्रिया या सर्व सामाजिक धाग्यांच्या विरोधात उभ्या आहेत. त्या पुरुषप्रधान संस्कृतीला नाकारून आपल्या स्वतःच्या विचारांना महत्त्व देत आहेत. मात्र, याच नाटकाच्या संदर्भात दोन गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत:

1. जरी या स्त्रिया आपल्या निर्णयावर ठाम असल्या तरीही त्यांचा निर्णय शेवटी पुरुषांच्या आणि त्यांच्या कुटुंबाच्या इच्छेच्या कक्षेतच अडकलेला दिसतो.
2. त्या पद्धतीने समाजाच्या मूल्यांचे अनुसरण करत असताना, त्यांच्या अस्तित्वाचे मूळ याच मूल्यांमध्ये लपलेले आहे.

**नाटकाच्या समाजातील प्रभावाचे विश्लेषण**

देवबाभळी नाटकाच्या माध्यमातून स्त्रीवादी दृष्टिकोनाचा एक पैलू समोर येतो. जरी या नाटकात अवलाई आणि लखुबाई पुरुषप्रधान संस्कृतीला नकार देत असल्या तरी, त्यांचा संवाद आणि संघर्ष या मूल्यांमध्येच अडकलेला आहे. म्हणूनच, आजही भारतीय समाजात स्त्रियांना अनेक सामाजिक, भावनिक आणि मानसिक अडचणींना तोंड देत समाजमान्य चौकटीतच जीवन जगावे लागते.

या नाटकातून एक मोठा संदेश असा आहे की स्त्रियांना त्यांचे हक्क मिळवण्यासाठी संघर्ष करत असताना, त्यांचा मार्ग सुस्पष्ट नक्कीच असावा लागेल. एक स्त्री म्हणून तिच्या इच्छांचा, हक्कांचा आणि अस्तित्वाचा स्वीकार समाजात होणे आवश्यक आहे.

**स्त्रीची छबी — नाटकातील आणि वास्तवातील तुलना**

- **नाटकातील स्त्रीस्तर**
  - अवलाई आणि लखुबाई: पारंपारिक भूमिकांच्या पलीकडे जात, त्यांनी स्वतःचे निर्णय घेण्याचा प्रयत्न केला — जसे की दुखः आणि दुर्लक्ष मांडणे ("रसून वनात जाणे"), देव किंवा पतीच्या गैरहजेरीत आपले अस्तित्व सांगणे. पण हे स्निग्धपणे, संतपणे, पुरुषप्रधान संस्कृतीला आतून स्वीकारलेले दिसते. नाटकाची सुंदरता, स्त्रीची अंतरिक तीव्रता या त्यांच्या संवादातून प्रकट होते. हे सत्य आहे की त्या स्वतःची ओळख आणि वेदना व्यक्त करतात, परंतु त्यांचा संघर्ष "पतीच्या छायेतून बाहेर पडणे" इतपतही पुढे जात नाही.
  - निर्णयक्षमता आणि सामाजिक स्वीकार: निर्णय स्वातंत्र्य असले तरीही त्या अंततः पतीच्या सुखासाठी त्याग करण्याकडे झुकतात, आणि त्यामुळे स्त्रीवादी दृष्टिकोन नसला तरी त्यात तमाम संदर्भातून स्त्री मनोभावनांचा जीवरहित मांडणी संभवते.
- **वास्तवातील स्त्री सशक्तीकरणाचा प्रवास**
  - आधुनिक कायदे आणि संस्था: आज स्त्रियांच्या विकासासाठी विविध कायदे, संस्था, सामाजिक चळवळी आहेत; तरीही "निर्णयक्षमता" आणि "पुरुषप्रधान संस्कृतीचा दबदबा" पूर्वीप्रमाणे कायम आहे. लक्षात घेणं गरजेचं आहे, इतकं सक्षमीकरण झालं नाही, जसं अपेक्षित आहे.
  - नाटकाचे सामाजिक महत्त्व: 'संगीत देवबाभळी' हे नाटक अनेक पुरस्कारांनी गौरविलं गेल्यामुळे, त्यातील बारीक आणि संवेदनशील स्त्रीचित्रणाला मार्गदर्शन मिळालं आहे.
  - शिक्षणात समावेश: हे नाटक २०२२ पासून मुंबई विद्यापीठाच्या तेसच २०२३ पासून शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर बी.ए. भाग २ च्या मराठी अभ्यासक्रमात समाविष्ट झाले असून, विद्यार्थ्यांना स्त्री मनोभावना आणि समाजोत्थानाचा दृष्टिकोन शिकवण्यात मदत होतो.

**निष्कर्ष**

'देवबाभळी' कलेच्या माध्यमातून स्त्रीची अंतःकरणात ज्या तीव्रतेने झळकणारी भूमिका उलगडते ती आजही भारतीय समाजात दिसते; अनेक स्त्रिया अद्यापही या संवादांच्या पलीकडे स्वतःची स्वातंत्र्यपूर्ण ओळख निर्माण करू शकत

नाहीत. म्हणून स्त्री सशक्तीकरणाची आजही आवश्यकता आहे, आणि या हेतूने नाटकात्मक चित्रण, सामाजिक अभ्यास आणि शैक्षणिक समावेश मानसाला विचार प्रवृत्त करतो.

**संदर्भ-**

१. प्राजक्त देशमुख 'देवबाभळी नाटक'(२०२३) पाचवी आवृत्ती –पॉप्युलर प्रकाशन, मुबंई.
२. सतीश कदम, 'मराठी साहित्य : रूप आणि रंग'(२०२३) (संपादक), शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर.
३. विलास आढाव 'महिला सबलीकरण'(२०१०) द्वितीय आवृत्ती – प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तर विभाग, पुणे विद्यापीठ.
४.अंकुश चव्हाण महिला सबलीकरण एक चिंतन – ( संशोधन लेख) कॉसमॉस मल्टीडीसिप्लीनिरी रिसर्च ईजरनल पान नं ६९ ते ७२
५. बी .ए भाग २ नाटक साहित्यकृती : देवभाबळी (२०२४) स्वयं अध्ययन साहित्य दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.